मो. 9822180540
9284216801

# अशोककुमार एम. वाघमारे | Ashokkumar M. Waghmare

बी.ए., एलएल.बी.
(सेवानिवृत्त धर्मादाय आयुक्त कार्यालय, सोलापूर)
ॲडव्होकेट
ऑफिस : शॉप नं. १० नाथ प्राईड अपार्टमेंट, सिव्हील हॉस्पिटल पाठीमागे, सोलापूर

B.A., LL.B.
(Retired Charity Office, Solapur)
ADVOCATE
Off.: Shop No. 10 Nath Pride App. Behind Civil Hospital, Solapur

Email. : adv.ashokkumarwaghmare57@gmail.com

श्री. पंडित दिनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, सोलापूर

Bill No. 0135

Date : / /20

| क्र. | तपशिल | प्रति | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | संस्था नोंदणी फी – | | | ४०००=०० |
| २) | स्टॅम्प पेपर २ | १०० | १००×२ | २००=०० |
| ३) | नोटरी २ | ३०० | ३००×२ | ६००=०० |
| ४) | नोंदणी फी | १०० | — | १००=०० |
| ५) | ॲफिडेव्हिट / ॲडमिनिस्ट्रेशन | १०० | — | १००=०० |
| ६) | कोर्ट स्टॅम्प | २०० | — | २००=०० |
| | Ad - २०००=०० | | | |
| | दि. १८/९/२२ ३०००=०० | | | |
| | जमा ५०००=०० | | एकूण | ५२००=०० |
| | बाकी २०० | | | ५२००=०० |

अक्षरी पाच हजार दोनशे रुपये मिळाले

Total 5200/-

[1]ॲड. अशोककुमार एम. वाघमारे करिता

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE SOLAPUR

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur.

परिशिष्ट - अ

दि. १८/०१/२०२२

प्रति,
**मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सोलापूर विभाग, सोलापूर

**विषय :-संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे अन्वये नोंदणीबाबत.......**

**संस्थेचा नांव व पत्ता : -**

## पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

**महोदय,**

निवेदन करण्यात येते की, वरील विषयांस नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी होण्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करावयाची आहे. सबब, आपणांकडे खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) विधानपत्र (ज्ञापन) मेमोरेंण्डम ऑफ असोसिएशन.
२) नियम व नियमावलीची सत्यप्रत असे.
३) संस्थेच्या पत्यात व नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र.
४) संस्थेच्या पत्यात व नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकार पत्र.
५) संस्थेच्या पत्यात व मालमत्ते बाबत अध्यक्ष व सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रु ५ चे पैसे कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० अन्वये संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे असून संस्थेच्या नावाची वा नामसदृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी शुल्क १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती.

आपला विश्वासू
डॉ. नेहा सुमित तंबाके
अर्जदार

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE SOLAPUR

Dr. ... R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur.

**सहपत्रे :** वरीलप्रमाणे.

परिशिष्ट - ब

# पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

**या संस्थेचे ज्ञापन मेमोरेण्डम ऑफ असोसिएशन**

१. संस्थेचे नांव :- पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

२. संस्थेचा पत्ता :- मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

३. संस्थेचे उद्देश :- खालीलप्रमाणे राहतील.

१) **सदर संघटन माजी विद्यार्थ्यांचे मदतीने कार्यरत राहील.**

२) आजी -माजी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयनिष्ठा दृढ करणे.

३) सुजाण नागरिक निर्माण होण्यासाठीच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.

४) माजी विद्यार्थी-महाविद्यालय यांचा आंतरसह संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

५) आजचे विद्यार्थी उदयाचे भारताचे भविष्य आहे. त्यासाठी राष्ट्रीय एकात्मिका जोपासण्या संदर्भात जे मार्गदर्शन केले. त्यावर त्यांची वाटचाल चालू राहील. यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.

६) परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, जाणीवा जागृती, मुक्त न्याय चिकीत्सालय, ग्रामीण भागात विधी साक्षरता शिबीरे संदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

७) माजी विद्यार्थ्यांने उत्तुंग यश संपादन केल्यास त्याला प्रोत्साहन देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करणे.

८) आजी - माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन कार्यास मार्गदर्शन करणे.

९) महाविद्यालयाच्या सभोवतालच्या परिसरात एकात्मता, सामाजिक सलोखा, शांतता प्रस्थापित करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणे.

१०) संशोधन केंद्र उभे करुन कार्यरत करणे.

११) सर्व स्तरावरील स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करणे.

१२) पुरोगामी विचारांची रुजवणूक करण्यासाठी सर्व महापुरुषांचे समाजपयोगी विचार समाजा पर्यंत पोहचविणे.

१३) विविध क्षेत्रातील कर्तृत्वान, गरीब, गरजू, होतकरु विशेष प्रविण्य प्राप्त आणि संधीची वाट पाहणाऱ्यांना मदत करणे, त्याच बरोबर प्रोत्साहनपर पुरस्कार देणे.

१४) चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, मेळावे, प्रशिक्षण शिबीरे, वाद विवाद स्पर्धा इ. आयोजन करणे.

१५) स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करुन स्त्रीयांच्या सबलीकरणास प्रोत्साहन देवून देश विकासाच्या कार्याला गतिमाण करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

PANDIT DEENDAYAL UPADHYAY ... SOLAPUR

१६) **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव** या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा लाभ इतर विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व त्यांच्या सुप्त गुणांद्वारे आजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना देणे. आजी व माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची व इतर गुणवत्तेची देवाण घेवाण वाढविण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे व विद्यार्थी संम्मेलनाचे आयोजन करणे. नृत्य, नाट्य, काव्य संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. राष्ट्रीय सण व व उत्सव साजरे करणे. व्याख्यानमाला आयोजित करणे. विविध प्रशासकीय सेवेसाठी प्रशिक्षण देणे व आदर्श व गुणवत्ता प्राप्त नागरिक तयार करुन देशाचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे.

**अ) शैक्षणिक :-** **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव** या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव** या महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यां सोबत मेळावे करुन या महाविद्यालयाच्या विकासासाठी मार्गदर्शन करणे. तसेच माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करणे. तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे व शैक्षणिक क्षेत्रात संशोधन करणे व शैक्षणिक कार्य करणे. तांत्रिक शिक्षण, संगणक, व्यवसाय प्रशिक्षण या संदर्भातील नवनविन कोर्स याबाबत माहिती देणे व मार्गदर्शन करणे. समाजातील सर्वस्तरावर शैक्षणिक संशोधन करणे. दिव्यांग, गरीब व होतकरु, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या तसेच वंचीत, मागास व भटके आणि विमुक्त ह्या वर्गासाठी प्रामुख्याने शिक्षणाचे प्रयत्न व प्रचार करणे. मदत करणे. महाविद्यालय व वसतीगृहे यांना प्रासंगिक मदत करणे. शिष्यवृत्तीकरिता शासन दरबारी प्रयत्न करणे (प्रासंगीक व गरजू मुलांना). ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देणे. शाळेतील विद्यार्थ्याला कमवा व शिका चे धडे देणे. गरीब व गरजु मुलासाठी, शिक्षणाची सोय, निवासाची सोय व भोजनाची सोय उपलब्ध करुन देणे.

**ब) क्रिडा :-** खेळांचे स्पर्धा व सामने भरविणे व त्यात भाग घेणे. व्यायाम, योगासन प्रशिक्षण देणे व स्पर्धांचे आयोजन करणे. क्रिडा शिबीरे आयोजित करणे.

**क) सामाजिक :-** समाजातील मुलां मुलींसाठी सामाजिक शिबीरे आयोजित करणे. प्रशिक्षण व मदत करणे. व सामाजिक कार्य करणे. जयंती, उत्सव व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College. Solapur.

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE * SOLAPUR. *

**ड) सांस्कृतिक** :- समाजातील मुलां मुलींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम करणे. थोर महापुरुषांच्या जयंती उत्सव साजरे करणे. अभिनयाचे प्रशिक्षण देणे. नृत्य, नाट्य, काव्य इत्यादी कलांचे प्रशिक्षण देणे व स्पर्धा आयोजित करणे.

**इ) पर्यावरण** :-पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी झाडे लावा, झाडे जगवा या वाक्याप्रमाणे वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करणे. वृक्ष तोड विरोधी जनजागृती करणे. ग्रामीण भागातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE * SOLAPUR. *

२. **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था** मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळाच्या सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपवण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रियत्व खालीलप्रमाणे आहेत.

| सभासदांचे नांव | पत्ता | पद | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|
| डॉ. नेहा सुमित तंबाके | फ्लॅट न. ४, रेल्वे लाईन्स, सोलापूर | अध्यक्ष | ३६ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. प्राची सागर महिंद्रकर | वृंदावन अपार्टमेंट, आकाशवाणी टॉवर रोड, नाशिक, जि. नाशिक | उपाध्यक्ष | ३७ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. सचिन शिवशंकर वांगीकर | स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, सोलापूर | सचिव | ३६ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. दिनेश पुंडलिक पगडीमल | पुजा अपार्टमेंट, अक्कलकोट रोड, सोलापूर | सहसचिव | ३१ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. अजिंक्य विलास अग्निहोत्री | २०५, आयुष आर्केड, दमाणी नगर, सोलापूर | खजिनदार | ३१ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. प्रज्ञा कृष्णा खताळ | निसर्ग हौसिंग सोसायटी, मुळशी, जि. पुणे | सदस्य | २८ | भारतीय | वैद्यकीय |
| डॉ. विष्णू विठ्ठल मस्के | मु.पो. कोर्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | सदस्य | ३१ | भारतीय | वैद्यकीय |

स्थळ :- केगांव
दिनांक :- ११/११/२०१९

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

(३)

३. यात आम्ही खालील सह्या करणार **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था** मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्थेची नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून वरील नावाची संस्था ही आज दिनांक : ११/११ /२०१९ रोजी स्थापन केली असून ती नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही यावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र | नांव | पत्ता | सह्या |
|---|---|---|---|
| १ | डॉ. नेहा सुमित तंबाके | फ्लॅट नं. ४, रेल्वे लाईन्स, सोलापूर | |
| २ | डॉ. प्राची सागर महिंद्रकर | वृंदावन अपार्टमेंट, आकाशवाणी टॉवर रोड, नाशिक, जि. नाशिक | |
| ३ | डॉ. सचिन शिवशंकर वांगीकर | स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, सोलापूर | |
| ४ | डॉ. दिनेश पुंडलिक पगडीमल | पुजा अपार्टमेंट, अक्कलकोट रोड, सोलापूर | |
| ५ | डॉ. अजिंक्य विलास अग्निहोत्री | २०५, आयुष आर्केड, दमाणी नगर, सोलापूर | |
| ६ | डॉ. प्रज्ञा कृष्णा खताळ | निसर्ग हौसिंग सोसायटी, मुळशी, जि. पुणे | |
| ७ | डॉ. विष्णू विठ्ठल मस्के | मु.पो. कोर्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | |

स्थळ :- केगांव
दिनांक :- ११/११/२०१९

वरील सह्या करणाऱ्यांना मी ओळखतो व त्यांनी
माझ्यासमोर यावर सह्या केल्या आहेत.
वकील संपूर्ण नांव व पत्ता शिक्का

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE * SOLAPUR *

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur.

Mob.No.9822180540

परिशिष्ट - क

# पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

## या संस्थेचे नियम व नियमावली

### नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | संस्था | : | म्हणजे विश्वस्त संस्था. |
| ब) | कार्यकारी मंडळ | : | म्हणजे या संस्थेच्या व्यवस्थापनेसाठी नेमलेले किंवा निवडलेले सदस्यांचे मंडळ. |
| क) | विश्वस्त | : | म्हणजे त्या व्यक्तिकडे केवळ त्याकडेच किंवा इतर व्यक्तिच्या समवेत विश्वस्त मालमत्ता विहित असेल ते व्यक्ति. |
| ड) | कार्यक्षेत्र | : | म्हणजे संस्था ज्या क्षेत्राच्या मर्यादेत कार्य करणार आहेत ते क्षेत्र. |
| इ) | सभासद | : | म्हणजे पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील माजी विद्यार्थी जी संस्थेच्या नियमाला बांधील राहून विहित नमुन्यात अर्ज करुन कार्यकारी मंडळात त्या अर्जाचा स्विकार केल्यानंतरची व्यक्ति. |
| ई) | मिळकत | : | म्हणजे संस्थेच्या मालकीची पण संस्थेच्या ताब्यात दिलेली सर्व गुंतवणूक रक्कम, स्थावर व जंगम मिळकत यामध्ये विशिष्ट हेतूसाठी संस्थेस देणगी रुपाने स्विकारणेच्या रक्कमेचा मालमत्तेचा समावेश राहिल. |
| २) | कार्यक्षेत्र | : | महाराष्ट्र राज्य. |
| ३) | हिशोबाचे वर्ष | : | १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहिल. |

४) **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :**

पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालयातील माजी विद्यार्थी ज्यांना या संस्थेचे नियम मान्य आहेत अशा व्यक्तिने विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर व ठराविक फि भरल्यानंतर व अशा अर्जाचा कार्यकारी मंडळात स्विकार केल्यानंतर त्या व्यक्तिस संस्थेचे सभासदत्व प्राप्त होईल.

५) **सभासदांचे प्रकार :**

अ) **साधारण सभासद : वार्षिक रुपये १००/- वर्गणी** आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर एक महिन्याचे आत रितसर पैसे भरुन साधारण सभासद होता येईल.

ब) **आजीव सभासद : रुपये १०००/-** किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देवून देणगीदाराच्या इच्छेनुसार व कार्यकारी मंडळाचे मान्यतेने देणगीदारास आजीव सभासद होता येईल.

६) **सभासदांचे सदस्यत्व रद्द होणेबाबत.**

अ) सभासद फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षेस पात्र झाल्यास व तो सिध्द झाल्यास.

ब) त्यांचेकडून नैतिक अधःपतन झाल्यास व तो सिध्द झाल्यास.

क) एखाद्या सदस्याने संस्थेच्या हिताविरुध्द वर्तन केल्यास, गैरवर्तन केल्यास व अशा गोष्टी कार्यकारी मंडळाच्या नजरेसमोर आल्यानंतर व ते सिध्द झाल्यानंतर सर्वसाधारण सभामध्ये बहुमताने सभासदांचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

ड) राजीनामा दिल्यास.

इ) वार्षिक वर्गणी न भरल्यास.

ई) मरण पावल्यास व सलग तीन सभांना गैर हजर राहिल्याससभासदांचे सदस्यत्व रद्द होईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

७) **सर्वसाधारण सभा व तिचे अधिकार :**

१) सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व नियंत्रण सभा म्हणून ओळखली जाईल.
२) या सभेत सर्वसाधारण भाग घेवू शकतील.
३) उपस्थित सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम बाकी थकली असल्यास त्या सभासदाला मतदानात भाग घेता येणार नाही. त्याचप्रमाणे ज्या सभासदाला संस्थेत प्रवेश घेवून सहा महिने झाले नसल्यास त्याला उपस्थित राहता येईल. परंतु मतदानात भाग घेता येणार नाही.
४) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारीच्या कामावर नियंत्रण ठेवणे.
५) वार्षिक हिशोब मंजूर करणे.
६) कार्यकारी मंडळाची निवड करणे.
७) पुढील वर्षाचे नवीन अंदाजपत्रके तयार करणे व मंजूर करणे.
८) संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास सात दिवसाच्या आत चार कार्यकारी मंडळ सदस्यांच्या विनंती वरुन अध्यक्षांनी सभा आयोजित केली पाहिजे.

८) **सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :**

सर्वसाधारण सभेची १४ पूर्ण दिवसाची नोटीस सदस्यांमध्ये आर.पी.ए.डी/हस्तपोच प्रस्तुत करण्यात येईल त्यात अशी सभा ज्या तारखेस ज्यावेळी व जेथे घेण्यात येईल ती तारीख, वेळ व जागा सदर सभेत करण्यात येणारे कामकाज निर्दिष्ट करण्यात येईल. व सदरची नोटीस संस्थेच्या कार्यालयात लावली जाईल. सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण होणेसाठी सर्व प्रकारचे ३/५सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे. जर सभासदांच्या सभेचा कोरम पूर्ण होणेसाठी सर्व ३/५ सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे. जर सभासदांच्या सभेच्या नोटीसमध्ये असा उल्लेख असला तरीही आवश्यक कोरम पूर्ण न झाल्यास त्या ठिकाणी अर्धा तासानंतर तहकूब झाल्याने सभा तेथेच होईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

९) **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :**

अध्यक्ष व कार्यकारी मंडळास जरूर वाटल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलविली जाईल तसेच कमीत कमी एकूण संस्थेच्या ३/५सभासदांनी लेखी मागणी केल्यास ते मागणीपत्र सादर झाल्यानंतर एक महिन्याचे आत रितसर अशी विशेष सभा अध्यक्ष सचिवांच्या मदतीने बोलावतील. या सभेची नोटीस व विषयपत्रिका सभासदांना किमान १० दिवस आधी दिली जाईल व अशी सभेत विषयपत्रिका नसलेल्या विषयाचा विचार केला जाणार नाही.

१०) **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :**

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकूण कमीत कमी ७ व जास्तीत जास्त ९ सभासदांचे राहिल. निवडून आलेले कार्यकारी मंडळ आपापसात खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडतील.

**अ) अध्यक्ष, ब) उपाध्यक्ष, क) सचिव, ड) सहसचिव इ) खजिनदार, ई) सदस्य-२**

११) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :**

अ) कार्यकारी मंडळाचा **कार्यकाल एकूण ५ वर्षांचा** राहिल.
ब) कार्यकारी मंडळाची निवड **दर ५ वर्षांनी** सर्वसाधारण सभेत **बहुमताने** निवडणूक पध्दतीने होईल.
क) जर ३/५सभासदांनी संस्थेकडे गुप्त मतदानाने निवडणूकीची मागणी केली तर त्याप्रमाणे निवडणूक घेण्यात येईल व त्या निवडणूकीची पध्दत खालील प्रमाणे आहेत.
१) संस्थेच्या कोणत्याही प्रकारची बाकी देणे असल्यास निवडणूकीसाठी तो सदस्य अपात्र राहिल.
२) एक वर्ष सभासद राहिल्यानंतरच त्यास मतदानाचा अधिकार राहिल.
३) निवडणूकीच्या तारखेची सूचना १० दिवसापूर्वी ऑफिस नोटीसीद्वारे द्यावी.
४) निवडणूक खुले मतदान पध्दतीने होईल.

अध्यक्ष   उपाध्यक्ष 9.   सचिव

Dr. [illegible] PRINCIPAL [illegible] College, Solapur

१२) **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांचे कामे :**

अ) **अध्यक्ष :**

सभेचे कामकाज चालविणे व हितसंबंधीचे योग्य ते आदेश देणे. संस्थेच्या कारभारावर व शाखेवर नियंत्रण ठेवणे, सर्वसाधारण सभा आयोजित करणे. जर सचिवाने एखादी सभा बोलाविली नाही तर अशी सभा अध्यक्ष बोलायेल.

ब) **उपाध्यक्ष :**

अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे काम करणे किंवा त्यांना त्यांचे कार्यात योग्य ते सहकार्य करणे.

क) **सचिव**

१) कार्यकारी मंडळाच्या सभा बोलावणे.
२) संस्थेचा पत्रव्यवहार अध्यक्षांच्या संमतीने करणे.
३) संस्थेच्या दृष्टीने आवश्यक असल्यास कोर्ट कचेरीचे कामे करणे.
४) संस्थेच्या कार्यावर लक्ष ठेवणे.
५) संस्थेच्या वार्षिक खर्चाचे बिले मंजूर करुन देणे.
६) ठरावाप्रमाणे मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे.

ड) **सहसचिव :-**

सचिवाच्या गैरहजेरीत सचिवाची कामे करणे.

इ) **खजिनदार**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे हिशोब लिहीणे अगर लिहून घेणे.हिशोब पूर्ण झाल्यावर सचिवांसमोर ठेवणे. हिशोबाच्या पुस्तकावर वार्षिक पत्रके तयार करणे, रक्कमेची देवाण घेवाण करणे, ऑडीटर यांनी हिशोब तपासून काढलेल्या त्रुटींची पुर्तता करणे.

ई) **सदस्य**

संस्थेच्या सर्व कामात सहकार्य करणे, मिटींगमध्ये व मतदानात भाग घेणे.

१३) **कार्यकारी मंडळाची सभा मागणीची सभा:**
कार्यकारी मंडळाची सभा दर तीन महिन्यातून एकदा तरी बोलाविली पाहिजे. कार्यकारी मंडळाच्या ३/५ सभासदांची लेखी मागणी केल्यास तातडीची कार्यकारणी सभा अध्यक्षांनी तीन दिवस अगोदर बोलाविली पाहिजे.

१४) **कार्यकारी मंडळाचे सभेची सुचना व गणसंख्या :**
कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना ७ दिवस अगोदर आर.पी.ए.डी / हस्तपोच पाठविलेली पाहिजे व सदर सभेत एकुण ३/५ सभासदांच्या कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने भरेल, त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

१५) **कार्यकारी मंडळाची निवडणूकीचे नियम :**

१) संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणूकीसाठी तो सदस्य अपात्र राहिल.
२) निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती १५ दिवसांपूर्वी करावी.
३) एक वर्ष सभासद राहिल्यानंतरच त्यास मतदानाचा अधिकार राहिल.
४) निवडणूक खुले मतदान पध्दतीने होईल.
५) निवडणूकीच्या तारखेची सुचना ८ दिवसापूर्वी ऑफिस नोटीसीव्दारे द्यावी.

१६) **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबावत :**
सभासद व पदाधिकारी यांनी राजीनामा द्यावयाचा असल्यास तो त्यांनी अध्यक्षांच्या जवळ द्यावा. आलेला राजीनामा कार्यकारी मंडळापुढे ठेवून बहुमताने मंजूरी द्यावी. आलेला राजीनामा मंजूर होईपर्यंत सभासदांचे पद कायम राहिल एखाद्या ट्रस्टीचे मृत्युमुळे किंवा राजीनाम्यामुळे किंवा एखादी जागा रिकामी झाली तर त्या जागी नविन सभासद कार्यकारी मंडळाच्या बहुमताने घेता येईल. अध्यक्षांनी उपाध्यक्षाकडे राजीनामा द्यावा.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE * SOLAPUR *

Dr. ... ANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur.

१७) **कार्यकारी मंडळाची अधिकार व कर्तव्ये :**

१) संस्थेच्या सेवकांची नेमणूक करणे, त्यांच्यावर लक्ष, नियंत्रण ठेवणे, त्यांना कामावरुन काढणे की, ज्यामुळे संस्थेच्या कामकाज व्यवस्थित चालेल.

२) संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे.

३) संस्था चालविण्यासाठी आवश्यक असलेले किरकोळ नियम तयार करणे.

४) सर्वसाधारण सभेच्या ठरावाची पुर्तता करणे.

५) संस्थेच्या वार्षिक कार्यकारी मंडळाची यादी तयार करुन मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे कार्यालयात त्याच्या ठरावाच्या नकलेसहीत दाखल करणे. त्याचप्रमाणे संस्थेच्या मालमत्तेत व मंडळात बदल झाल्यास अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर कार्यालयात पाठविणे.

६) सभासदांची यादी ठेवणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांची नोकरीचे अटीचे पुस्तक कायद्याप्रमाणे ठेवणे त्याबाबतीत परिशिष्ठ - २ प्रमाणे माहिती रजिस्ट्रार यांचे कार्यालयात दरवर्षी पाठविणे.

७) कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने नियम लागू करणे व असे नियम सर्व सभासदांवर बंधनकारक असतील.

८) जमाखर्चाचे हिशोब ठेवून ऑडीट करणे व ते सामान्य सभेपुढे ठेवणे.

९) उपसमित्या नेमणे किंवा एखाद्या कामासाठी एखाद्या सदस्याला अधिकार देणे.

१०) कार्यकारी मंडळाचे सभेत एकूण ३/५ सभासदांचा कोरम राहिल. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा अर्ध्या तासाने तेथेच भरल्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

११) संस्थेच्या हितासाठी आवश्यक असलेले इतर योग्य ते कायदेशिर कार्य करणे.

१८) **संस्थेचा निधी व मिळकत विनीयोग :**
संस्थेचे निधीमध्ये सभासद वर्गणी, देणगी, सरकारी अनुदान यांचा समावेश होईल. त्याचा विनीयोग उद्देशावर करण्यात येतील.

१९) **उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद :**
संस्थेच्या उद्देशाकरिता ८० टक्के, व इतर कार्यालयीन खर्चाकरिता २० टक्के

२०) **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतुद :**
कलम ३५ व ३६ प्रमाणे (३) मा. धर्मादाय सह आयुक्त यांचे पुर्वपरवानगीने ठेवी किंवा अनामत रक्कम स्विकारण्यात येतील.

२१) **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतूद :**
स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री करताना सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवून कलम ३५ प्रमाणे खरेदी व कलम ३६(१) प्रमाणे विक्रीस मा.जॉईन्ट चॅरिटी कमिशनर यांचे पूर्व परवानगीने स्थावर मालमत्ता खरेदी-विक्रीचे व्यवहार केले जातील.

२२) **बँन्क खाते :**
ट्रस्ट ॲक्टप्रमाणे मान्यता प्राप्त बँकेत संस्थेचे खाते उघडण्यात येतील व बॅन्केतून पैसे काढण्याचे अधिकार, **सचिव व खजिनदार** या दोघांचे संयुक्त सहीने करण्यात येतील.

२३) **संस्थेचे नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतुद :**
नियमावलीत बदल करावयाचा असल्यास सर्वसाधारण सभेत ठराव घेवून ३/५बहुमताने मंजूर झाल्यावर आवश्यक ते नविन करुन घेता येतील किंवा काढता येतील.

२४) **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :**
१८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी महाराष्ट्र संस्था नोंदणी अधिनियम १९७१ मधील नियम क्र. १५ अनुसूची प्रमाणे क्र. ६ चे नमुन्यात ठेवण्यात येतील. तसेच अनुसूची क्र. १ व २ चेही नमुने ठेवण्यात येतील.

अध्यक्ष

उपाध्यक्ष 

सचिव

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur

PANDIT DEENDAYAL UPADHYAY ... SOLAPUR

२५) **संस्थेच्या नावांत व उद्देशात बदल करण्याबाबतीची तरतूद :**

संस्थेचे नांव अथवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थेचे विलिनीकरण करावयाचा असल्यास १८६० चे नोंदणी अधिनियमातील कलम १२ व १२ (अ) प्रमाणे कार्यवाही करण्यात येतील.

२६) **विसर्जन :**

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्याने ३/५ सभासदांच्या बहुमताने सभेत मंजूरी घ्यावी लागेल व संस्थेचे सर्व प्रकारचे देवाण-घेवाण संबंधीचा व्यवहार पूर्ण करावा लागेल. संस्थेची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येतील. **विश्वस्त व्यवस्था अधिनियम १८६० अन्वये कलम १३,१४ प्रमाणे** संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

## दाखला

प्रमाणित करण्यात येते की, सदरील ज्ञापन व नियम नियमावली ही **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था** मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर ही या संस्थेच्या ज्ञापन व नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

स्थळ :- केगांव
दिनांक :- ११/११/२०१९

| अ.नं. | नांव | पद | सही |
|---|---|---|---|
| १ | डॉ. नेहा सुमित तंवाके | अध्यक्ष | |
| २ | डॉ. प्राची सागर महिंद्रकर | उपाध्यक्ष | |
| ३ | डॉ. सचिन शिवशंकर वांगीकर | सचिव | |



Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
Solapur.

क्रमांक 8881

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०
(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र-84/28

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय मार्फत विद्यार्थी संस्था. मु.पो. केगाव ता. द. सोलापूर जि. सोलापूर

यांची तत्संबंध संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 18/1/28 २०० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सहाय्यक संस्था निबंधक
सहाय्यक संस्था निबंधक
सोलापूर विभाग सोलापूर

सहाय्यक संस्था निबंधक सोलापूर विभाग, सोलापूर

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL ... SOLAPUR

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College Solapur.

परिशिष्ट - अ

दि. १८/११/२०२२

प्रति,
मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर विभाग, सोलापूर

**विषय :-संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे अन्वये नोंदणीबाबत.......**

**संस्थेचा नांव व पत्ता : -**

## पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर -

**महोदय,**

निवेदन करण्यात येते की, वरील विषयांस नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी होण्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करावयाची आहे. सबब, आपणांकडे खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) विधानपत्र (ज्ञापन) मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन.
२) नियम व नियमावलीची सत्यप्रत असे.
३) संस्थेच्या पत्यात व नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र.
४) संस्थेच्या पत्यात व नोंदणीबाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकार पत्र.
५) संस्थेच्या पत्यात व मालमत्ते बाबत अध्यक्ष व सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर रु ५ चे पैसे कोर्ट फी स्टॅम्पसह.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे सर्व उद्देश सन १८६० अन्वये संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे असून संस्थेच्या नावाची वा नामसदृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी शुल्क १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती.

आपला विश्वासू

डॉ. नेहा सुमित तंबाके
अर्जदार

**सहपत्रे :** वरीलप्रमाणे.

# परिशिष्ट - ब

## पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था

मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

**या संस्थेचे ज्ञापन मेमोरेण्डम ऑफ असोसिएशन**

संस्थेचे नांव :- **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय माजी विद्यार्थी संस्था**

संस्थेचा पत्ता :- मु.पो. केगांव, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर

संस्थेचे उद्देश :- खालीलप्रमाणे राहतील.

**सदर संघटन माजी विद्यार्थ्यांचे मदतीने कार्यरत राहील.**

१) आजी -माजी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयनिष्ठा दृढ करणे.
२) सुजाण नागरिक निर्माण होण्यासाठीच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे.
३) माजी विद्यार्थी-महाविद्यालय यांचा आंतरसह संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
४) आजचे विद्यार्थी उदयाचे भारताचे भविष्य आहे. त्यासाठी राष्ट्रीय एकात्मिका जोपासण्या संदर्भात जे मार्गदर्शन केले. त्यावर त्यांची वाटचाल चालू राहील. यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.
५) परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, जाणीवा जागृती, मुक्त न्याय चिकीत्सालय,
६) ग्रामीण भागात विधी साक्षरता शिबीरे संदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.
७) माजी विद्यार्थ्यांने उत्तुंग यश संपादन केल्यास त्याला प्रोत्साहन देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करणे.
८) आजी - माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन कार्यास मार्गदर्शन करणे.
९) महाविद्यालयाच्या सभोवतालच्या परिसरात एकात्मता, सामाजिक सलोखा, शांतता प्रस्थापित करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणे.
१०) संशोधन केंद्र उभे करुन कार्यरत करणे.
११) सर्व स्तरावरील स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करणे.
१२) पुरोगामी विचारांची रुजवणूक करण्यासाठी सर्व महापुरुषांचे समाजपयोगी विचार समाजा पर्यंत पोहचविणे.
१३) विविध क्षेत्रातील कर्तृत्वान, गरीब, गरजू, होतकरु विशेष प्रविण्य प्राप्त आणि संधीची वाट पाहणाऱ्यांना मदत करणे, त्याच बरोबर प्रोत्साहनपर पुरस्कार देणे.
१४) चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, मेळावे, प्रशिक्षण शिबीरे, वाद विवाद स्पर्धा इ. आयोजन करणे.
१५) स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करुन स्त्रीयांच्या सबलीकरणास प्रोत्साहन देवून देश विकासाच्या कार्याला गतिमाण करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा लाभ इतर विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व त्यांच्या सुप्त गुणांद्वारे आजी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना आजी व माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची व इतर गुणवत्तेची देवाण घेवाण साठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे व विद्यार्थी संमेलनाचे आयोजन करणे. नाट्य, काव्य संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. राष्ट्रीय सण व उत्सव साजरे करणे. व्याख्यानमाला आयोजित करणे. विविध प्रशासकीय सेवेसाठी प्रशिक्षण देणे व आदर्श व गुणवत्ता प्राप्त नागरिक तयार करुन देशाचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे.

**अ) शैक्षणिक** :- **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव** या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. **पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय, केगांव** या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी सोबत मेळावे करुन या महाविद्यालयाच्या विकासासाठी मार्गदर्शन करणे. तसेच माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करणे. तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे व शैक्षणिक क्षेत्रात संशोधन करणे व शैक्षणिक कार्य करणे. तांत्रिक शिक्षण, संगणक, व्यवसाय प्रशिक्षण या संदर्भातील नवनविन कोर्स याबाबत माहिती देणे व मार्गदर्शन करणे. समाजातील सर्वस्तरावर शैक्षणिक संशोधन करणे. दिव्यांग, गरीब व होतकरु, आर्थिक दृष्टया मागासलेल्या तसेच वंचीत, मागास व भटके आणि विमुक्त ह्या वर्गासाठी प्रामुख्याने शिक्षणाचे प्रयत्न व प्रचार करणे. मदत करणे. महाविद्यालय व वसतीगृहे यांना प्रासंगिक मदत करणे. शिष्यवृत्तीकरिता शासन दरबारी प्रयत्न करणे (प्रासंगीक व शाळेतील गरजू मुलांना). ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देणे. विद्यार्थ्यांना कमवा व शिका चे धडे देणे. गरीब व गरजु मुलासाठी, शिक्षणाची सोय, निवासाची सोय व भोजनाची सोय उपलब्ध करुन देणे.

**ब) क्रिडा** :- खेळांचे स्पर्धा व सामने भरविणे व त्यात भाग घेणे. व्यायाम, योगासन प्रशिक्षण देणे व स्पर्धांचे आयोजन करणे. क्रिडा शिबीरे आयोजित करणे.

**क) सामाजिक** :- समाजातील मुलां मुलींसाठी सामाजिक शिबीरे आयोजित करणे. जयंती, उत्सव व सामाजिक प्रशिक्षण व मदत करणे. व सामाजिक कार्य करणे. कार्यक्रमाचे आयोजन करणे.

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

PANDIT DEENDAYAL UPADHYAY DENTAL COLLEGE SOLAPUR

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur

**ड) सांस्कृतिक :-** समाजातील मुलां मुलींसाठी सांस्कृतिक कार्यक्रम करणे. थोर महापुरुषांच्या जयंती उत्सव साजरे करणे. अभिनयाचे प्रशिक्षण देणे. नृत्य, नाट्य, काव्य इत्यादी कलांचे प्रशिक्षण देणे व स्पर्धा आयोजित करणे.

**इ) पर्यावरण :-**पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी झाडे लावा, झाडे जगवा या वाक्याप्रमाणे वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करणे. वृक्ष तोड विरोधी जनजागृती करणे. ग्रामीण भागातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

SOLAPUR. * PANDIT DEENDAYAL

Dr. BIRANGANE R.S.
PRINCIPAL
P.D.U. Dental College, Solapur.